सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४३०/४६५/४९२
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक : १०/प्रवेश प्रकिया/बैठक सुचना/२०२४/२३४ दिनांक : 4 JUN 2024

परिपत्रक (इमेलव्दारे)

विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील पदविका अभियांत्रिकी / वास्तुकला अभ्यासक्रमांच्या प्रवेशात वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून मार्गदर्शन करण्यासाठी दि.०५/०६/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित ऑनलाईन बैठकीबाबत...

संदर्भ : १) संचालनालयाचे का.आ. १०/एडीएम/सुविधा केंद्र/Post SSC/DSD/२०२४/२११, दि.२४/५/२०२४
२) संचालनालयाचे परिपत्रक क्र.१०/एडीएम/नोडल ऑफीसर/पदविका/२०२४/२१२, दि.२७/५/२०२४
३) संचालनालयाची प्रवेशासाठीचे वेळापत्रक क्र. तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/दहावीनंतरचे प्रथम वर्ष पदविका/२०२४/२१५, दि. २७.५.२०२४.

मागील काही वर्षांपासुन उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील तंत्रनिकेतनांद्वारे “स्कुल कनेक्ट” हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत दहावीच्या शाळेमध्ये तंत्रनिकेतनांचे व त्यांच्या विद्याशाखांचे सादरीकरण, प्रवेशाबद्दल मार्गदर्शन, जाहिराती, मुलाखती, प्रसिद्ध माजी विद्यार्थी / उद्योजक यांचे मनोगत अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. याचाच परिणाम म्हणजे अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशामध्ये दरवर्षी सातत्याने वाढ होत आहे. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ ला असलेले ४० टक्के प्रवेश शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये ८७ टक्के झालेले आहेत. संस्थांनी राबविलेल्या सकारात्मक उपक्रमांमुळे हे शक्य झाले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील दहावीनंतरच्या प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे. सदर प्रवेशप्रक्रियेच्या अनुषंगाने संदर्भ क्र.१ वरील कार्यालयीन आदेशान्वये इयत्ता १० वी नंतरच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम, थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशांकरिता सुविधा केंद्र (Facilitation Centre-FC) घोषित करण्यात आलेली आहेत. संचालनालयाच्या संदर्भ क्र.२ वरील पत्रान्वये, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने सुविधा केंद्रांना येणाऱ्या अडचणींचे निवारण करण्यासाठी नोडल अधिकारी (Nodal Officer) नियुक्त करण्यात आलेले आहेत. तसेच दहावीनंतरच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी / वास्तुकला पदविका प्रवेशाचे वेळापत्रक संचालनालयाच्या संदर्भ क्र. ३ वरील पत्रान्वये प्रसिध्द करण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता १०० टक्के प्रवेश करण्याचे ध्येय ठेवून या वर्षीची प्रवेश प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे. सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व स्टेक होल्डर्सकडून नियोजनबध्द पध्दतीने प्रयत्न होणे अपेक्षित आहे. त्याअनुषंगाने सर्व पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम राबविणाऱ्या सर्व संस्थांचे प्राचार्य व प्रवेश प्रक्रियेतील संबंधित अधिकारी यांची ऑनलाईन पध्दतीने बैठक दि.०५/०६/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता निम्नस्वाक्षरीकारांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात येत आहे. सदर बैठकीत प्रवेश प्रक्रियेबाबत व प्रवेश वाढीसाठी करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तदनंतर अर्ज नोंदणी, स्विकृती व पडताळणी प्रक्रियेविषयी सविस्तर माहिती देण्यात येईल.

सदर ऑनलाईन बैठकीत सर्व सहसंचालक, सहाय्यक संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, संचालक व सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई, उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, जिल्ह्याचे नोडल अधिकारी, सर्व अभियांत्रिकी / वास्तुकला पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांचे प्राचार्य, सुविधा केंद्रांचे मुख्य समन्वयक यांनी सहभागी व्हावे. सर्व संबंधितानी बैठकीसाठीची लिंक संबंधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी. बैठकीपूर्वी संबंधितांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रवेश प्रक्रियेचा अहवाल तयार ठेवावा.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत: माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

१. कार्यासन क्र.३, मुख्य कार्यालय, मुंबई यांनी सदर परिपत्रक प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे व बैठकीसाठीची लिंक सहसंचालक, विभागीय कार्यालयांना ईमेलद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/छत्रपती संभाजीनगर/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे, यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या स्तरावरुन आपल्या अखत्यारीतील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे. तसेच कार्यासन क्र.३, मुख्य कार्यालय, मुंबई यांच्याकडून प्राप्त होणारी बैठकीची लिंक सर्व संबधितांना उपलब्ध करुन द्यावी. तसेच त्यांनी आपल्या अधिनस्त असलेले सर्व संबंधित बैठकीस हजर राहतील याची दक्षता घ्यावी.

३. संचालक, मे. फोर पिलर्स इन्फोटेक इंडिया प्रा.लि., ए-१०१, कुमार श्वास, बाणेर पाषाण लिंक रोड, ओजस सोसायटी, पुणे यांनी सदर बैठकीसाठी आवश्यक तांत्रिक बाबी, मनुष्यबळ व युजर मॅन्युअल इ. बाबींची व्यवस्था करावी.